भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०७/२०१८

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद:**

दिनांक २२/०७/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन नातीन वय ०५ वर्ष ही शेजारी राहणारा शालिक सोनटक्के यांचे घरी टि.व्ही. पाहण्यास जाते असे सांगुन गेली होती की, यातील आरोपीने पिडीत मुलीचे हात धरून त्याचे जुने पडके घरात नेवुन तिच्यावर अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७६ भादवी. सहकलम ४,६,पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.दांदळे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २२/०७/२०१८ चे ०८.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीची ही नाजुका भगत यांचे घराचे समोरील नळावर पाणी भरत असतांनी विनयभंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादी जवळ जावुन फिर्याचे दोन्ही हात पकडुन जवळ जावुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४(अ)(१) भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. आळे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) सीआरआय कंपनीची मोटार पंपची चोरी : –**

दिनांक २०/०७/२०१८ चे १८.०० ते २१/७/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी धनराज जागोजी वनवे वय ५९ वर्ष रा. सालई बु. याचा टांगा शेत शिवारातील २ एचपी सीआरआय कंपनीची मोटार पंप किमती ५,०००/रु. ची लावलेली कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोथनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) दारूच्या नशेत वाहन चालवीतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद–**

दिनांक २२/०७/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही शामराव चौक भंडारा येथे दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. तिवारी वानीशा. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**. ५) अवैध हातभट्टी /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी,दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन भंडारा, तुमसर, व अडयाळ येथे अवैध हातभट्टी, देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १४ लिटर हा.भ. दारू कि + १४.०० /रु. तसेच जुगारातुन किंमती २,२६०/रु. असा एकुण ३,६६० /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २२/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवाशी– ०१ तीन सिटर वाहनाकरीता– ०४ ईतर वाहनांवरती – १३४ केसेस करण्यात आले आहे.

(पोउपनी.जे.के.आडोळे)
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.